श्रीमती जयश्रीराणी बाळकृष्ण सुर्वे, सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित) यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक :-पकानि-१५१५/१७०६/प्र.क्र.३२२/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- ३० डिसेंबर, २०१५.

पहा :- १. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीव्ही-१२१२/७०९/प्र.क्र.१३७/नवि-२७, दि.२८.०८.२०१२.
२. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यकारी आदेश क्र.आस्था/गट-अ/ससंनर/ना.नि./प्रशा-१/५१२४, दि.२९.०८.२०१२.
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीव्ही-२४१४/प्र.क्र.५२/नवि-२७, दि.२६.०८.२०१४.
४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यकारी आदेश क्र.आस्था/ससंनर/बदली/प्रशा-१/४६१८, दि.२६.०८.२०१४.
५. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आस्था/जबासु-ससंनर/प.का./प्रशा-१/८४, दि.०२.११.२०१५.

प्रस्तावना :-

नगर विकास विभागाच्या **संदर्भ-१** येथील दि.२८.०८.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील तांत्रिक संवर्गातील रिक्त असलेली "सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित)" पदे नामनिर्देशनाने उपलब्ध झालेल्या उमेदवारांमधून भरण्याबाबत शासन आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार संचालनालयाच्या आस्थापनेवर पूर्वीपासून कार्यरत असलेल्या व अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे एम. ई. प्रशिक्षणार्थी असलेल्या श्रीमती जयश्रीराणी बाळकृष्ण सुर्वे, तत्कालीन नगर रचनाकार (गट-अ / राजपत्रित) यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून "सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित)" (वेतनसंरचना रु.१५,६००-रु.३९,१००+ग्रेड पे रु.६,६००) पदावर दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीकरिता नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली आहे. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या **संदर्भ-२** येथील दि.२९.०८.२०१२ च्या कार्यकारी आदेशान्वये श्रीमती ज. बा. सुर्वे, तत्कालीन नगर रचनाकार यांची "सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित)" पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्यात येऊन त्यांची अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथील एम. ई. प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षण सुरु ठेवण्यात आले होते.

०२. तद्नंतर, श्रीमती ज. बा. सुर्वे, सहाय्यक संचालक, नगर रचना यांचे अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथील एम. ई. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची नगर विकास विभागाच्या **संदर्भ-३** येथील दि.२६.०८.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये “सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक” पदावर पदस्थापना करण्यात आली आहे. संचालक, नगर रचना व

मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या **संदर्भ-४** येथील दि. २६.०८.२०१४ रोजीच्या कार्यकारी आदेशानुसार त्यांनी "सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक" पदाचा कार्यभार दि.२८.०८.२०१४ (म.पू.) स्वीकारलेला असून सध्या उक्त पदावर त्या कार्यरत आहेत.

०३. श्रीमती ज. बा. सुर्वे, सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी दि.३०.०८.२०१२ ते दि.२९.०८.२०१४ या परिविक्षा कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची रजा उपभोगली नसल्याने त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी दि.२९.०८.२०१४ (म.नं.) रोजी संपुष्टात येईल.

०४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या **संदर्भ-५** येथील दि.०२.११.२०१५ च्या पत्रान्वये श्रीमती ज. बा. सुर्वे, सहाय्यक संचालक, नगर रचना यांचा दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी समाप्त करुन त्यांची "सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित)" पदावर नियमित नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर केलेला आहे.

०५. सबब, श्रीमती ज. बा. सुर्वे, सहाय्यक संचालक, नगर रचना यांचा दि.३०.०८.२०१२ (म.पू.) पासून सुरु झालेला दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी समाप्त करुन त्यांची "सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित)" पदावर नियमित नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत :-

शासन निर्णय :-

श्रीमती जयश्रीराणी बाळकृष्ण सर्वे, सहाय्यक संचालक, नगर रचना ह्या "सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित)" पदाच्या सेवाप्रवेश नियमातील अटी व शर्तींची तसेच इतर आवश्यक सेवाविषयक बाबींची पूर्तता करीत असल्याने व त्यांनी दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केला असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ३९ अपवाद १ (ए) (एक) मधील तरतुदीनुसार त्यांचा "सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित)" पदाचा दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी दि.२९.०८.२०१४ (म.नं.) रोजी संपुष्टात आणण्यात येत असून त्यांची "सहाय्यक संचालक, नगर रचना (गट-अ / राजपत्रित)" (वेतनसंरचना रु.१५,६००-रु.३९,१००+ग्रेड पे रु.६,६००) पदावर दि.३०.०८.२०१४ (म.पू.) पासून नियमित नियुक्ती करण्यात येत आहे.

०२. सदरचे आदेश सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९४/१८३७/प्र.१८/९५/आठ, दि.२८ मार्च, १९९५ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.परिवि-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दि.२५ ऑगस्ट, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक २०१५१२३०१५२५१७५२२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Shriram Dattatraya Yadav

Digitally signed by Shriram Dattatraya Yadav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=50cb0ce4cc4fe54c74f42b860354e86ec00b3b36f5f215c9f7658e611006a200, cn=Shriram Dattatraya Yadav
Date: 2016.01.04 17:16:07 +05'30'

(श्री. द. यादव)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रति,

श्रीमती जयश्रीराणी बाळकृष्ण सुर्वे, सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक यांना
(संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई / महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
२. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई / महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई / नागपूर.
४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे. **(०३-प्रती)**
५. सह संचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.
६. सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक शाखा, नाशिक.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक, जि. नाशिक.
८. निवडनस्ती / नवि-२७.

*****